# शहरातले आजी आजोबा
# शेड्यातले पेईंग गेस्ट

देशात अकरा कोटी ज्येष्ठ नागरीक आहेत. एके काळी ''मातृदेवो भव। पितृदेवो भव'' अशी संस्कृति नांदत असल्यामुळे घरोघरी ज्येष्ठांना मानाने वागवले जायचे. मात्र आताच्या काळात बदललेल्या जीवन पद्धतीमध्ये ज्येष्ठांचे आयुष्य कठीण झालेले आहे. परिस्थितीचे गांभिर्य ओळखून मुलांनी आपल्या आईवडीलांची काळजी घ्यावी असे कायदेही करण्यात आलेले आहेत. मात्र क्वचितच कोणी ज्येष्ठांने या कायद्यांचा आधार घेऊन आपल्या मुलाविषयी तक्रार केलेली असेल कारण शेवटी वृद्धांना त्यांच्या मुलां बरोबरच रहायचे असते-जगायचे असते.

अनेक वृद्धांना एकाकी जगावे लागते. काही जण दुकटेही असतात. काही जण कुटुंबात मुला मुलींसोबत रहात असतात. शहरात राहणाऱ्या वृद्धांचे अनेक प्रश्न आहेत.

एकटे-दुकटे राहणाऱ्यांन सुरक्षीततेचा प्रश्न असतो. मुला मुलींबरोबर कुटुंबात राहणाऱ्यांचेही वेगळे प्रश्न असतात. जागा अपुरी असते, धावपळीच्या जीवनात त्यांच्याकडे पाहयला तरुण पिढीला वेळ नसतो, किंबहुना आईवडीलांनी सासूसासऱ्यांनी प्रॉपर्टी एकदा आपल्या नावावर करुन द्यावी आणि सरळ वरची वाट धरावी असा विचार करणारेही कमी नाहीत. कुटुंब व्यवस्थाच एकंदरीत मोडकळीस आलेली आहे. लहान मुले पाळणाघर आणि शाळेत डांबलेली आणि वृद्ध माणसे वृद्धाश्रमात आणि घरातील कर्त्या दोन्ही व्यक्ति दिवस रात्र कामात किंवा मिळवलेला पैसा उपभोगण्यात. अशा परिस्थितीत तरुण माणसे जेवढा आपल्या पिकल्या केसांचा विचार करतात तेवढाही विचार घरातल्या पिकल्या पानांचा करत नाहीत.

शहरातल्या वृद्धांची अशी परिस्थिती असताना खेड्यातल्या शेतकऱ्यांची परिस्थिती तर अत्यंत विचित्र झालेली आहे. हवामान बदलले आहे आणि तेथील परिस्थितीही बदललेली आहे. जागतिकीकरणानंतरच्या या काळात कोणत्याही पिकाला भाव मिळेनासा झाला आहे. खात्रीशीर उत्पन्न मिळेल अशी संधिच दिसेनाशी झाली आहे.

अशा वेळेला मनात एक विचार चमकून जातो की, जर या दोन्ही गटांपैकी काही जणांना एकत्र येण्याची संधि मिळाली तर त्यांचे प्रश्न एकत्र येण्यामुळे सुटू शकतील, त्यातून ''शहरातले आजी आजोबा खेड्यातले पेईंग गेस्ट'' अशी एक कल्पना सुचली. एक तर खेड्यात राहणे वृद्धांच्या दृष्टीने कमी खर्चाचे आहे. शहरातील ट्रॅफीक आणि प्रदूषण यापासनू सुटका होऊ शकेल. महत्त्वाचे म्हणजे वृद्धांकडे पर्याय आहे हे लक्षात आल्यावर तरुण पिढीची त्यांच्याकडे पाहण्याची दृष्टि बदलेल.

एकेकाळी समाजात वानप्रस्थाश्रम आणि सन्यासाश्रम अशा कल्पना रुढ होत्या, आधुनिक जगात त्या कल्पनांना पर्याय शोधण्याचा हा एक प्रयत्न आहे.

''खेड्याकडे चला'', ''खरा भारत देश खेड्यात राहतो''. आपण चरितार्थाच्या धावपळीत शहरात आलो आता म्हातारपणी खेड्यात जायला हवं, आपल्या ज्ञानाचा, अनुभवाचा लाभ त्यामुळे देता येईल. कॉन्टॅक्टचा लाभ देता येईल. महत्त्वाचे म्हणजे खेडी आणि शहरे जोणारा एक पुल तयार होईल.

'व्हर्च्युअल' जगात माणूस माणसापासनू दूर गेला आहे. माणसा माणसांना जोडण्याचा हा प्रयत्न आहे.

आजी आजोबा आणि नातवंडे हे भावनिक नाते वेगळेच असते. आजी-आजोबा खरे तर मुलांवर संस्कार करण्याचे महत्त्वाचे काम करत असतात. आता संस्कारांची किंमत करता येत नाही. किंवा 'मूल्ये'

बाजारात विकली जात नाहीत म्हणून काही जीवन मूल्यांची गरज नाही असे म्हणता येणार नाही.

मुले जे आई वडीलां बरोबर बोलू शकत नाहीत अशा गोष्टी आजी आजोबांना सांगतात. आजी आजोबांच्या नुसत्या असण्याने सुद्धा त्यांना आधार मिळू शकतो. आताच्या काळात लहान मुलांना पूर्वीच्या काळापेक्षा जास्त ताणतणाव सहन करावे लागतात आणि जे ताणतणाव नुसते मन मोकळे केल्यावर सुद्धा नाहीसे झाले असते असे ताणतणाव मनात साचत जातात व त्या ताणतणावांची परिणति दु:खद घटनांमध्ये होते. शाळेचे निकाल लागल्यावर ज्या अनेक आत्महत्या होतात त्या मनमोकळे करता आले तर थांबवता येतील. खूपशा प्रमाणात थांबवता येतील.

आताच्या काळात आपण आपली मुले नोकरा चाकरांवर सोपवू शकत नाहीत. त्याच प्रमाणे नोकर चाकर वृद्धांची काळजी घेतीलच असे नाही. वेळोवेळी नोकरांनी घरात चोऱ्या केल्याचे नव्हे तर खून केल्याचे प्रकारही घडलेले आहेत.

अनेक आजी आजोबांची मुले अमेरिकेत आणि इतर देशात स्थाईक झाली आहेत. सगळेच काही वाईट नसतात. महत्त्वाचे म्हणजे या देशात आपल्या आईवडीलांची चांगली सोय व्हावी अशी इच्छा असली तरी यंत्रणा नसते. वृद्धाश्रम किंवा वृद्धांच्या हौसिंग सोसायट्या ह्या त्यावर उत्तर नव्हे. किंबहूना अशा ठिकाणी वेळोवेळी येणारी अम्ब्युलन्स वृद्धांच्या मनावर आघातच करते. ''उद्या आपली पाळी'' हे मनातून जाता जात नाही. 'शहरातले आजी आजोबा खेड्यातले पेईंग गेस्ट' या कल्पनेमुळे परदेशात असणाऱ्या मुलांना आपल्या आईवडीलांची काळजी घेणारी एक नवी यंत्रणा या निमित्ताने अस्तित्वात येऊ शकेल.

''शहरातले आजी आजोबा खेड्यातले पेईंग गेस्ट'' ही संकल्पना वधूवर सूचक मंडळासारखी आहे. ज्या वृद्ध व्यक्तींना शेतात

राहण्याची इच्छा आहे तसेच ज्या शेतकऱ्यांना आपल्या शेतात वृद्धांची सोय करायची आहे त्यांनी आमचेकडे नाव नोंदवावे. आवश्यक ती माहिती द्यावी, त्यामुळे दुसऱ्या पक्षाला निर्णय घेता यावा.

वृद्धांसाठी आणि शेतकऱ्यांसाठी खूप काही केले पाहिजे, आपण ही एक सुरुवात करु यात.

संपर्क :

१) श्री.पद्माकर देशपांडे, मो. ९३२५००६२९१, फोन ०२०-२५४४०३१० प्रकल्प अधिकारी, वरिष्ठ नागरिक कल्याण, उबाळे ब्रदर्स फौंडेशन, पुणे.

२) उबाळे ब्रदर्स फौंडेशन, २ भारती अपार्टमेंट, शिवाजी रोड, नतावाडी, शिवाजीनगर, पुणे ५. संपर्क : ८८०६४४६८२४ / ०२०-२५५३३९०७

www.ubalebrothers.com यामध्ये सोशल सेक्शन मध्ये नोंदणी करावी.